# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१) ७६९ (०७-०४-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक कीर्तीच्या स्मारकाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून माहे डिसेंबर, २०२४ अखेर फक्त ५० % काम पूर्ण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारकाचे उर्वरित काम निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच काम पूर्ण करण्यासाठी अंतिम मुदत काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) विभागाच्या दिनांक २६/०३/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन स्तरावर समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच, प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १६/०६/२०२५ रोजीच्या बैठकीत माहे, ऑक्टोबर २०२६ पूर्वी स्मारक प्रकल्पाची प्रस्तावित कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लाखनी (जि.भंडरा) येथील ग्रामीण भागातील पाणंद रस्त्याच्या बिकट अवस्थेमुळे शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी अडचणी येत असल्याबाबत

**(२) १२६३ (०९-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखनी (जि.भंडारा) तालुक्यातील ग्रामीण भागातील बरेच मुख्य रस्त्ये खड्डेमय झाले असून पाणंद रस्त्याच्या दुरावस्थेमुळे शेतकऱ्यांना जाण्या-येण्यासाठी अडचणी येत आहे. सदर तालुक्यात मातोश्री ग्राम समृध्द शेत पाणंद रस्ते योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखनी तालुक्यात मातोश्री ग्राम समृध्द शेत पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांना त्याचा फायदा लवकरात लवकर करून देण्याच्यादृष्टीने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (१७-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) लाखनी तालुक्यात मातोश्री ग्राम समृध्द शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत मंजूर एकूण ३५ कामांपैकी २२ कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ०४ कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत. मजुरांमार्फत होणारी कामांची मागणी नुसार अन्य कामे पूर्ण करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अड्याळ (ता.पवनी, जि.भंडारा) ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेअंतर्गतयोजनेंतर्गत बनावट मंजूर आढळून आल्याअसल्याबाबत

**(३) १२६७ (१४-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अड्याळ (ता.पवनी, जि.भंडारा) ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामासाठी बनावट मजुरांची नोंद असल्याने ग्रामपंचायत लोकप्रतिनिधीनी खंडविकास अधिकारी, पवनी यांचेकडे चौकशी करण्याची मागणी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेच्या कामासाठी आलेल्या बोगस मजूरांवर व ठेकेदारांवर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (२७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रकरणी ग्राम रोजगार सेवक यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना ग्रामपंचायत अधिकारी यांना देऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी भंडारा यांना दिले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे प्रलंबित असल्या प्रलंबित असलेल्या कामाबाबाबत

**(४) १३०२ (१४-०४-२०२५) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या कामापैकी नरेगा प्रणालीनुसार जे जिल्हे ६० : ४० चे प्रमाण राखू शकले नाहीत अशा जिल्ह्यात नरेगाची कामे नव्याने सुरू करू नये असा शासनाचा आदेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात सदर योजनेंतर्गत मुळात कामे कमी झालेली असल्यामुळे ६०:४० चे प्रमाण राखलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशाप्रकारे ६०:४० चे प्रमाण राखलेल्या जिल्ह्यामध्ये सदर प्रलंबित कामे पूर्ववत सुरू करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (१७-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासनपत्र दिनांक २०/०३/२०२५, दिनांक ०९/०५/२०२५ आणि दिनांक १३/०५/२०२५ अन्वये मनरेगा योजनेंतर्गत ६०:४० चे प्रमाण राखणाऱ्या कामांच्या अंमलबजावणी संदर्भात आवश्यक ते निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत.

**(५) १४८६ (१४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूमी अभिलेख विभागात अधिकारी व कर्मचारी यांची २५२८ पदे रिक्त असल्याने अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे तसेच अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कामाचा प्रचंड ताण पडत असून नागरिकांची जमिनीची मोजणी, मिळकतपत्रिका तयार करणे, रेकॉर्ड तयार करणे आदी कामे होण्यास विलंब लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आढावा घेवून भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :** (१) होय.

माहे डिसेंबर २०२४ अखेर राज्यात गट अ संवर्गातील १७ व गट ब संवर्गातील ९४ अशी एकूण १११ पदे रिक्त होती. तसेच गट-क संवर्गातील शिरस्तेदार, परिरक्षण भूमापक, भूकरमापक या संवर्गात एकूण १०५३ पदे रिक्त होती व गट-ड संवर्गात १३८२ पदे रिक्त होती अशी एकूण २५४६ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध कर्मचारी यांच्याकडून मोजणी करुन तसेच मिळकतपत्रिका तयार करणे, रेकॉर्ड तयार करणे इत्यादी कामाचा निपटारा केला जात आहेत.
(२) उप संचालक भूमि अभिलेख (गट-अ) संवर्गातील रिक्त २ पदे शासन आदेश, दिनांक ०३/०४/२०२५ अन्वये भरण्यात आली आहेत.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख (गट-अ) व उप अधीक्षक भूमि अभिलेख (गट-ब राजपत्रित) संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. तसेच (गट-क) संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाच्या समस्यांबाबत

**(६) २२६२ (२९-०५-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१९ मध्ये ऊसतोड कामगारांना मूलभूत सेवा सुविधा पुरविण्यासाठी स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळ स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामंडळामध्ये शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून प्रति टन १० रुपये कपात करून महामंडळाकडे वर्ग करण्याचे आदेश शासनाने दिले असून दरवर्षी महामंडळाकडे कोट्यवधी रुपये जमा होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामंडळाकडे जमा झालेल्या उत्पन्नातून ऊसतोड कामगारांना मूलभूत सेवा सुविधा पुरविल्या जात नसल्यामुळे ऊसतोड कामगार सदर सुविधांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ऊसतोड कामगारांना कोणत्या सोयी सुविधा दिल्या जात आहेत तसेच दरवर्षी या महामंडळाकडे सुमारे २०० साखर कारखान्यांकडून जमा होणाऱ्या कोट्यवधी रुपयांचा विनियोग कसा केला जातो याची माहिती सर्वसामान्य ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यासाठी व यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (११-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महामंडळाकडे राज्यातील साखर कारखान्यांकडून सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ पर्यंत एकूण ११५.१६ कोटी एवढा निधी जमा झालेला आहे. सदर प्राप्त निधीमधून महामंडळाकडून शासन पत्र क्र.ऊकाकम-२०२४/ प्र.क्र.१७३/ महामंडळे दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ अन्वये पात्र ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम यांचे कुटूंबिय/वारस यांना रुपये ५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) इतक्या रकमेचे आर्थिक सहाय्य देणेबाबत शासन मान्यता देण्यात आल्यानुसार, ९२ मयत ऊसतोड कामगारांच्या वारसदारांना आर्थिक सहाय्य तसेच १० ऊसतोड कामगारांच्या वैयक्तिक अंपगत्व आणि वैद्यकीय खर्चापोटी आर्थिक सहाय्य देण्यात आलेले असून, त्यापोटी रुपये ४६६.५० लक्ष इतका निधी संबंधित सहायक आयुक्त, समाज कल्याण यांना वर्ग करण्यात येऊन संबंधित वारसदार आणि ऊसतोड कामगार यांना आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे.तसेच शासन निर्णय क्र.ऊकाकम-२०२३/ प्र.क्र.१६४/ महामंडळे दिनांक १० ऑक्टोंबर २०२४ अन्वये महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेले सर्व ऊसतोड कामगार, वाहतूक कामगार व मुकादम झोपडी व बैलजोडी यांच्या करीता गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार ४८ मयत ऊसतोड कामगारांच्या वारसदारांना आर्थिक सहाय्य तसेच १ वैयक्तिक अंपगत्व प्रस्ताव आणि ५२ वैद्यकीय खर्चापोटी प्रस्ताव, बैलजोडी मृत्यू/अपंगत्व करीता ४७ प्रस्ताव आणि झोपडीस आग लागणे करीता ८ प्रस्ताव असे एकूण १५६ प्रस्तावांकरीता रुपये २ कोटी ८३ लाख इतके सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे.शासन निर्णय दिनांक १५ जून २०२१ व शासन निर्णय दिनांक १० जानेवारी २०२४ अन्वये राज्यात स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी "संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यास व त्यानुसार मुलांसाठी ४१ व मुलींसाठी ४१ अशी एकूण ८२ (प्रत्येकी १०० क्षमतेची) वसतिगृह भाडेतत्वावरील इमारतींमध्ये सुरू करण्यास मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

## चंद्रपूर शहरातीलला लागून असलेल्या इरई नदीचे दाताळा पूल ते हडस्ती पर्यंत ९० मीटर रुंदीकरण व २ मीटर खोलीकरण तातडीने करणेबाबत

**(७) २६०७ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील इरई नदी औद्योगिक कारणामुळे पूर्णतः प्रदूषित झालेली असून २०१६ पासून अनेकवेळा या नदीच्या खोलीकरण व पुनर्जीवनकरीता निधी नसल्याने अनेकवेळा काम थांबविण्यात आले, असून या नदीच्या पुनर्जीवनकरीता डब्लु.सी.एल.ने सन २०१६ मध्ये रुपये ५,४१,००,०००/-अर्थसहाय्य देवूनही हे काम अद्यापही पूर्ण होवू शकले नसल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) चंद्रपूर शहराला लागून असलेल्या इरई नदीचे दाताळा पूल ते हडस्ती पर्यंत ९० मीटर रुंदीकरण व २ मीटर खोलीकरण करण्याबाबत इरई (नदी) बचाव जनआंदोलन या संस्थेच्या वतीने मा.ना. डॉ.अशोकजी उईके, पालकमंत्री, चंद्रपूर जिल्हा यांना दिनांक २५ एप्रिल,२०२५ रोजी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दिनांक १२ मे, २०२५ रोजी निवेदन देऊन मागणी केली असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या १७ कि.मी. च्या लांबीच्या या नदीच्या पात्रामध्ये पुनर्जीवनाकरीता खनिज निधीमधून या दहा वर्षात एकूण किती रक्कम खर्च करण्यात आली व या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने इरई नदीचे दाताळा पूल ते हडस्ती पर्यंत ९० मीटर रुंदीकरण व २ मीटर खोलीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२१-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदर कामाकरीता वेस्टर्न कोल्ड लिमिटेड, चंद्रपूर कडून रुपये ५.४१ कोटी निधी तसेच महाऔष्णीक विद्युत केंद्राकडून १ कोटी निधी प्राप्त होता.या निधीतून सन २०१५ ते २०१७ दरम्यान एकूण ९४५.८४ सघमी गाळ नदी पात्रातून काढण्यात आला आहे. तसेच सर्वेक्षण, अन्वेषण, पर्यवेक्षण, आस्थापनाचे व अनुषंगिक कामे करण्यात आली.
(२) यानुषंगाने इरई (नदी) बचाव जनआंदोलन या संस्थेच्या वतीने मा.ना. डॉ. अशोकजी उईके, पालकमंत्री, चंद्रपूर जिल्हा यांना दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी निवेदन दिले असून त्यानुसार जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून कार्यवाही सूरू आहे.
(३) खनिज निधीमधून मागील दहा वर्षात महामंडळांतर्गत जलसंपदा विभागामार्फत खर्च करण्यात आलेला नाही.
(४) चंद्रपूर शहराला लागून असलेल्या इरई नदीचे दाताळा पूल ते हडस्ती पर्यंतची लांबी १२.७ कि.मी. असून या लांबीपैकी रामसेतू पूलापासून चौराळा पूलापर्यंत २६०० मी. लांबीमध्ये जवळपास ६५ ते ७० मी. नदीचे रुंदीकरण करून ८० स.घ.मी. गाळ इरई नदी पुनरुज्जीवन अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यात काढण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापुर जिल्ह्यात कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करणेबाबत

**(८) ३४८५ (१८-०७-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रब्बी हंगाम आक्टोबर ते मार्च असा घेतला जात असून सोलापुर जिल्हा हा रब्बीचा जिल्हा म्हणुन ओळखला जात असून सोलापूर जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी १ लाख ९० हजार शेतकऱ्यांना २ हजार ७१ कोटी रुपये पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांना पीककर्ज वाटपाचे ठरवण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण झालेले नसुन जिल्ह्यातील बँकांनी केवळ ६७ हजार शेतकऱ्यांना १३०७ कोटी रुपये एवढेच कर्जवाटप केल्याचे दिनांक ३१ मार्च, २०२५ अखेर निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बँकांना ठरवून दिलेल्या पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास कोणत्या अडचणी येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (१९-११-२०२५) :** (१) होय.
(२) नाही.

सन २०२४-२५ साठी सोलापूर जिल्ह्यासाठी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., सोलापूर या बँकेसह राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका व महाराष्ट्र ग्रामीण बँक या बँका मिळून रब्बी हंगामासाठी १,८९,९९५ शेतकऱ्यांसाठी रुपये २०७०.५८ कोटी इतका पीक कर्ज वाटपाचा लक्षांक निर्धारित करण्यात आला होता.

त्यानुसार १,४२,७३५ शेतकऱ्यांना मार्च, २०२५ अखेर २१२७.११ कोटी इतके कर्ज वाटप करण्यात आले असून ते उद्दिष्टाच्या १०२ टक्के इतके आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील बँकांनी रब्बी हंगामासाठी पीक कर्ज वाटपाचे उदिष्ट पूर्ण केले नाही अशी वस्तुस्थिती नाही.
(३) कर्जमाफी योजनांमुळे पीक कर्ज नुतनीकरणासाठी शेतकऱ्यांकडून जिल्ह्यातील बँकांना प्रतिसाद मिळत नसल्यामुळे पीक कर्ज वाटपाच्या शेतकरी संख्येचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदर्की ब्रुद्रुक (ता.फलटण, जि.सातारा) येथे गत सहा महिन्यापासून तलाठी व ग्रामसवेक ग्रामसेवक पदेपदे रिक्त अस भरली नसल्याबाबत

**(९) ३६०३ (१७-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदर्की ब्रुद्रुक (ता.फलटण,जि.सातारा) या गावात गेल्या सहा महिन्यांपासून तलाठीचे पद रिकामे असून या गावांची जबाबदारी कापशी किंवा हिंगणगाव येथील तलाठ्यांकडे सोपवण्यात आल्याने शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्र मिळण्यास विलंब होत असून दोन गावांचे एकत्र कामकाज पहावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदर्की ब्रुद्रुक (ता.फलटण, जि.सातारा) या गावातील रिक्त असलेली तलाठी पदे लवकरात लवकर भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सदर सजा मध्ये मौजे आदर्की बु. व आदर्की खुर्द ही दोन गांवे समाविष्ट आहेत. सदर तलाठी सजासाठी ग्राम महसूल अधिकारी १ पद मंजूर आहे.

आदर्की बुद्रुक (ता.फलटण, जि.सातारा) या गावाच्या सजावर नियमित तलाठी यांची नियुक्ती दिनांक १५/१०/२०२४ रोजी करण्यात आली होती. सदर तलाठी हे दिनांक २८/०१/२०२५ ते दिनांक ०१/०६/२०२५ या कालावधीत असाधारण रजेवर असल्याने सदर सजाचा अतिरिक्त कार्यभार अन्य तलाठ्याकडे सोपविण्यात आला होता.सदर रजेवर असलेले तलाठी हे दिनांक ०२/०६/२०२५ रोजी आदर्की बुद्रुक या सजावर हजर झाले असून नियमित कामकाज पाहात आहेत. तसेच येथील शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्र मिळण्यास विलंब झाल्याबाबतची तक्रार शासनाकडे प्राप्त झालेली नाही.

---

## मुंबई येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील ४० टक्के जंगल क्षेत्र निकृष्ट असल्याबाबत

**(१०) ४१३३ (१७-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर परिसरात जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सुमारे ४० टक्के जंगल क्षेत्र निकृष्ट असल्याचे एका अभ्यास अहवालाद्वारे माहे मे, २०२५ मध्ये तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासाच्या अहवालातील शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (०४-०९-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील वनाच्या आरोग्याच्या संबंधाने कोणताही अधिकृत संशोधन अभ्यास करण्यात आलेला नाही. तसेच याबाबत अभ्यासासाठी कोणीही संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली कार्यालयाकडून परवानगी घेतलेली नाही. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील वनाच्या आरोग्याच्या संबंधाने प्रबंध आंतरजालावर उपलब्ध असून, त्यामध्ये विविध निर्देशकांचा अभ्यास करून संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन क्षेत्राबाबत निष्कर्ष काढले आहेत. सदरचा अभ्यास उपग्रहाच्या रिमोट सेन्सिंग आणि GIS तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केला असून, सदर अभ्यासातून काढलेल्या निष्कर्षानुसार कमी आरोग्यदायी वने ३९.५२%, आरोग्यदायी वने ३६.५१%, अत्यंत आरोग्यदायी वने ३.३६% असल्याचे त्यांचे संशोधन अहवालात निष्कर्ष काढले आहेत. सदरचे निष्कर्ष हे अभ्यासकाने त्यांचे अभ्यासाचा विषय म्हणून व त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे काढले असल्याने सदर निष्कर्ष संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली कार्यालयाकडून प्रमाणित केलेले नाही. तसेच सदर अहवालाबाबत वन विभागाकडे कोणताही दस्तऐवज कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाहीत. भारतीय वन सर्वेक्षण संस्था, देहरादून यांचेकडील Indian State of Forest Report, २०२३ मध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये ८१.२० चौ. कि.मी. वनक्षेत्र हे मध्यम घनतेचे असून, सन २०२१ च्या तुलनेत ०१.४२ चौ.कि.मी. वनक्षेत्रामध्ये वाढ झालेली दिसून येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील शाळेत अनुकंपा तत्त्वावरील भरती करण्याबाबत

**(१०) ७०२३ (१९-०४-२०१७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन मान्य अनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास दिनांक ३१ डिसेंबर, २००२ च्या शासन निर्णयानुसार त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्थांमधील रिक्त झालेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर भरती करण्यास शालेय शिक्षण विभागाने दिनांक ३१ डिसेंबर, २००२ रोजीचा शासन निर्णय असूनही जिल्हाधिकाऱ्यांकडून जाणीवपुर्वक टाळाटाळ केली जात असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यात गत ८ वर्षापासून ४५ प्रकरणे प्रलंबित असून तर राज्यातील विविध जिल्ह्यात शेकडो प्रकरणे प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील शेकडो शिक्षकांची कुटुंबे निराधार झाली आहेत, ही ही खरी आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील अनुकंपा तत्त्वावरील भरती तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे, तसेच सदर अनुकंपा तत्त्वावरील भरतीस टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अनुकंपा नियुक्तीचे प्रस्ताव पदभरती बंदी, आकृतिबंध अंतिम नसणे, अर्ज करण्यास विलंब होणे या कारणास्तव क्षेत्रिय स्तरावर अनुकंपा नियुक्तीस मान्यता देणेबाबतचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात येत असल्याबाबतचे निदर्शनास आले होते. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अनुकंपा तत्वावरील प्रस्ताव उक्त कारणास्तव प्रस्ताव प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबतच्या सूचना दिनांक १४/०९/२०२२ च्या शासन पत्रान्वये सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील कुष्णूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील इंडिया मेगा ॲग्रो कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(१२) १०३८५ (१९-११-२०२१) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कुष्णूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथील इंडिया मेगा ॲग्रो अनाज कंपनीने शेतकऱ्यांचा शेतमाल सोयाबीन, हळद, हरभरा, मका, खरेदी करून गत सहा महिन्यापासून शेतकऱ्यांचे पैसे थकीत ठेवले असून जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी इंडिया मेगा ॲग्रो अनाज कंपनीकडून

शेतकऱ्यांच्या होत असलेल्या फसवणुकीच्या संदर्भात प्रशासनाला निवेदन देऊन देखील प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांचा शेतमाल शेतकऱ्यांकडून खरेदी करून तो विक्री केल्यानंतर आलेला पैसा शेतकऱ्यांना न देता बँकेचे कर्ज भरण्यासाठी वापरण्यात येतो, असे शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत असून इंडिया मेगा ॲग्रो अनाज कंपनीच्या संचालकांवर नांदेड जिल्ह्यातील स्वस्त धान्य घोटाळा प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने इंडिया मेगा ॲग्रो अनाज कंपनीने केलेला स्वस्त धान्य घोटाळा प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर तातडीने कारवाई करुन अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांची थकीत रक्कम त्यांना एक रक्कमी स्वरुपात तातडीने मिळावी यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२४-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

देशातंर्गत कडधान्याचा पुरवठा सुरळीत ठेवणे व डाळींचे दर स्थिर ठेवण्यासाठी केंद्रशासनाने कडधान्याची आयात करण्याचा निर्णय घेतला आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत उत्पादन खर्चासाठी विचारात घेतल्या जाणाऱ्या निविष्ठांच्या किंमतीमध्ये वाढ/घट, खुल्या बाजारातील किंमतीच्या काढलेल्या भारांकित सरासरी मध्ये वाढ/ घट तसेच उत्पादनामध्ये वाढ/घट झाल्याने उत्पादन खर्चात वाढ/घट झाल्याचे दिसून येते. उदा.

(खर्च रुपयात)

| पीक | उत्पादन खर्च | | वाढ/घट |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | |
| तूर | ७३०७८.६१ | ६८२४४.६० | -४८३४.०६ |
| मूग | ४३४३७.३७ | ४४७१५.६० | +१२७८.२६ |

खरीप हंगाम २०२१-२२ च्या सुरुवातीपासूनच राज्यात मूग, उडीद व तूरीचे बाजारभाव हे किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.
(३) हे खरे नाही.

हंगाम २०१६-१७ ते २०२०-२१ मध्ये विमा कंपन्यांना एकूण रुपये २७,६९८.८८ कोटी विमा हप्त्याची रक्कम अदा करण्यात आलेली असून, १८,७१०.२६ कोटी इतकी नुकसानभरपाई अदा करण्यात आलेली आहे.
(४) हंगाम २०२१-२२ मध्ये नैसर्गिक आपत्तीअंतर्गत दिनांक २१/१२/२०२१ अखेर ४१,५१,६४४ पूर्वसूचना प्राप्त झाल्या असून मार्गदर्शक सूचनांनुसार सर्वेक्षणाअंती नुकसानभरपाई निश्चित केली आहे. तसेच हंगामातील प्रतिकुल परिस्थितीमुळे होणारे नुकसान याअंतर्गत एकूण २३ जिल्हयांमध्ये संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून अधिसूचना निर्गमित करुन नुकसान भरपाई निश्चित करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२१ मध्ये योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २१/१२/२०२१ अखेर ४८.६४ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसानभरपाईची रक्कम रुपये २७१२.४७ कोटी निश्चित करण्यात आली असून, आतापर्यंत ४४.२६ लाख शेतकरी अर्जदारांना रुपये २५००.५५ कोटी रक्कम वाटप करण्यात आली आहे. उर्वरित शेतकरी अर्जदारांना नुकसानभरपाईची रक्कम वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत देशांतर्गत कडधान्य पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रात व उत्पादकतेत वाढ आणि नवनवीन बियाण्यांचा वापर करुन कडधान्याचे उत्पादन वाढविण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे.

त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या पीकाला योग्य हमी भाव मिळावा याकरीता हमी भावाने मूग,उडीद व सोयाबीन खरेदीसाठी राज्यात एकूण ३८४ खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली असून दिनांक २८/१०/२०२१ पासून खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. दिनांक २२/१२/२०२१ पर्यंत झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे:-

| पीक | नोंदणी केलेले शेतकरी | एकूण खरेदी | लाभार्थी शेतकरी (क्विंटलमध्ये) |
|---|---|---|---|
| मूग | ३७२८ | १०३७६.३१ | २१९४ |
| उडीद | २५२० | ८३७७.५८ | ११८५ |
| सोयाबीन | ८५ | ० | ० |

तसेच हमी भावाने तूर खरेदीसाठी दिनांक २०/१२/२०२१ पासून नोंदणी प्रक्रिया सुरू केली असून, आत्तापर्यंत १८१ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. तुरीची प्रत्यक्ष खरेदी ०१/०१/२०२२ पासून सुरू होणार आहे.

---

## श्री.विजय कानवडे या शिक्षकाचे मागील १० वर्षापासूनचे वेतन थकित असल्याबाबत

**(१३) १०४७५ (०६-०१-२०२२) श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परमार्थिक सेवा संघ संचलित ज्ञानमकरंद विद्यालय, खरवई, (ता.खालापूर, जि.रायगड) या सन १९९६ पासून कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या संस्थेतील शिक्षकांचे समायोजन १० वर्षापर्यंत करण्यात आले नसून या संस्थेतील माध्यमिक शिक्षक श्री.विजय गंगाधर कानवडे यांचे सन १९९६ ते २००६ या कालावधीचे शासनाकडे देय असलेले वेतन देण्याबाबत मा.शालेय शिक्षण मंत्री, राज्यमंत्री आणि शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना माहे फेब्रुवारी, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.कानवडे या शिक्षकाचे थकीत वेतन व्याजासह देण्यात यावे असा आदेश मा.उच्च न्यायालयाने शिक्षण विभागाला दिला असूनही मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिक्षकाचे थकीत असलेले वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार संबंधित शिक्षकांचे समावेशन मान्यता प्राप्त शाळेत केले आहे. विद्यार्थीअभावी शाळा बंद पडल्याने त्याची जबाबदारी तत्कालीन कार्यरत शिक्षकांवर येते. तसेच दिनांक १६/६/१९९६ ते १९/२/२००६ या कालावधीमध्ये बंद पडलेल्या शाळेतील शिक्षक कोठेही सेवेत नव्हते. No work no pay या तत्वानुसार संबंधित शिक्षकाचे वेतन देय ठरत नाही. त्यामुळे सदर शिक्षकाचे शाळा बंद पडलेल्या कालावधीतील वेतन देय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये युनेस्कोच्या अहवालाच्या अनुषंगाने शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(१४) ११८३३ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भरुन काढण्यासाठी ११ लाख १६ हजारांहून अधिक शिक्षकांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले असून महाराष्ट्रात आणखी ७४ हजारांहून अधिक शिक्षकांची गरज असल्याचे नुकतेच "युनेस्को" च्या अहवालावरुन निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन युनेस्कोच्या स्टेट ऑफ एज्युकेशन रिपोर्ट फॉर इंडिया २०२१ "नो क्लास, नो टीचर" या अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) देशातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भरून काढणेसाठी सुमारे ११ लाख १६ हजारहून अधिक शिक्षकांची गरज असल्याचे नमुद केल आहे व त्यापैकी महाराष्ट्रात ७४ हजारांहून अधिक शिक्षकांची भरती करणेची गरज असल्याची माहिती युनेस्कोच्या स्टेट ऑफ एज्युकेशन रिपोर्ट फॉर इंडिया, २०२१ च्या अहवालातून निदर्शनास आली आहे. तथापि, सदर शिक्षकांची गरज ही बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार संबधीत संस्थेव्दारा केलेल्या सर्वेक्षणानुसार आहे.

तथापि, सन २०२०-२१ च्या संचमान्यतेच्या आधारे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये ६५१२७ पदे रिक्त असल्याबाबतची वस्तुस्थिती आहे.
(२) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण २१,८३९ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार १८,०३४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच दूसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे १०,००० शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक

अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास अंतरीम स्थगिती दिली असल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन तसेच पदभरतीसंदर्भात कार्यवाही करता येत नव्हती नाही. त्यामुळे बरेच वर्ष शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे भरली जात नव्हती. सदरची स्थगिती सद्य:स्थितीत उठलेली आहे. शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) परीक्षा पात्र उमेदवारास कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत

**(१५) ११९४१ (३०-०३-२०२२) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवेत कार्यरत असलेल्या व शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या परंतु, माहे डिसेंबर, २०२१ अखेर टीईटी उत्तीर्ण न झालेल्या राज्यातील शिक्षकांची संख्या किती आहे व सदरहू शिक्षकांचे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एकदा टीईटी परीक्षा पात्र झालेल्या उमेदवारास कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार कार्यरत शिक्षकांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत संपादित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षकांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/०३/२०१९ अखेर धारण करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार कार्यरत शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत प्राप्त करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिक्षकांच्या सेवा संपुष्टात करण्यात याव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मार्च २०१९ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या बाबतीत वेगळयाने कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) एकदा शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कायमस्वरुपी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण समजण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बृहत आराखड्याशिवाय स्वयंअर्थसहाय्यित प्राथमिक,माध्यमिक,व उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता दिल्याबाबत

**(१६) १३७२३ (२५-०८-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बृहत आराखड्याशिवाय कुठल्याही स्वयंअर्थसहाय्यित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता दिल्याने त्याचा परिणाम अनुदानित शाळांवर होऊन विद्यार्थी पट संख्येत घट होवून शिक्षक अतिरिक्त ठरत असल्याचे माहे मे, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-११-२०२५) :** (१) अंशतः खरे आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना दाखल करण्याचा पालकांचा कल असल्याने इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाने जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रलंबित वेतन मिळणेबाबत

**(१७) १५४३६ (२८-१२-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने जिल्हा परिषद, नगरपरिषद तसेच खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, २०२२ चे वेतन दिवाळी सणापूर्वी अदा करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी जाहीर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड सह रायगड जिल्ह्यातील शिक्षकांना ऑक्टोबर महिन्याचे वेतन दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ पर्यंत प्राप्त झाले नाही तसेच काही जिल्ह्यांमधील शिक्षकांना तुटपुंजे वेतन मिळाले असून तब्बल २६ जिल्ह्यांमधील शिक्षकांची दिवाळी पगाराविनाच गेली असल्याने उक्त शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या घोषणेची अंमलबजावणी न झाल्याने सदर बाबीचा निषेध म्हणून राज्यातील अनेक शिक्षक संघटनांनी शासनाला एक रुपयांची मनी ऑर्डर करून शासनाच्या या घोषणेचा निषेध केला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाड पोलादपूर तालुक्यात १००० पेक्षा जास्त शिक्षक विद्यादानाचे काम करीत असून रायगड जिल्ह्यात ही संख्या सुमारे साडेआठ हजार एवढी असल्याने पगार न मिळाल्यामुळे शिक्षकांमध्ये शासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे, हेही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, उक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) "वितरीत केलेले अनुदान केवळ नियमित वेतनासाठी असून यामधून अन्य कोणतेही देयके या अनुदानातून अदा करण्यात येऊ नये" असे स्पष्ट निर्देश संचालनालयाने दिले असतानाही काही जिल्ह्यामध्ये थकीत वेतन, ७ व्या वेतन आयोगाचा १ ला, २ रा व ३ रा हप्ता, थकीत महागाई भत्ता व इतर थकीत देयके अदा करण्यात आली, त्यामुळे काही जिल्हयांमधील शिक्षकांचे दिवाळीपूर्वी वेतन होऊ शकले नाहीत. ज्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा परिषद शिक्षकांचे वेतन दिवाळीपूर्वी झालेले नाही, त्या जिल्ह्यांमधील जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांच्यावर संचालनालय स्तरावरुन कारवाई करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच वेतनासाठी तरतूद कमी असल्यामुळे ७ व्या वेतन आयोगाच्या पहिल्या व दुसऱ्या हप्त्यांसाठी मंजूर पुरवणी मागणीही वित्त विभागाच्या मान्यतेने नियमित वेतनासाठी उपलब्ध करुन मार्च, २०२३ अखेरची वेतनाची देयके प्राथम्याने अदा करण्यात आली आहेत.

---

## मुंबई उपनगरातील देवीपाडा मागाठाणे येथील म्हाडाचा भूखंड क्रिडा संकुल विकसित करण्याबाबत

**(१८) १६८४७ (२८-१२-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील देवीपाडा मागाठाणे येथील म्हाडाचा भूखंड क्रिडा संकुल विकसित करण्यासाठी तत्कालीन विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांनी क्रिडा व युवक कल्याण मंत्री महोदयांना पत्र देऊन दिनांक ०२ मार्च २०२० रोजी वा त्यासुमारास विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवीपाडा मागाठाणे येथील नगर भूमापन क्रमांक २१२ (भाग) व २१५ (भाग) देवीपाडा मौजे मागाठाणे हा म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावर स्थानिक लोकांकडून क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर भूखंडावर क्रिडा संकुल विकसित करून पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (३१-१०-२०२५) :** (१) होय.
(२) होय.
मुंबई उपननगरातील देवीपाडा मागाठाणे भु. क्र. २१२ (भाग) व २१५ (भाग) येथील २४०० चौ. मी. जागा म्हाडाच्या मालकीची असून सदर जागेवर निवासी संकुलाचे आरक्षण आहे. सदर ठिकाणी म्हाडातर्फे निवासी प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे.

सद्यास्थितीत सदर मोकळया मैदानावर म्हाडाकडून क्रीडा स्पर्धा, प्रदर्शने आणि धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याकरीता भाडे घेऊन परवानगी देण्यात येते.
(३) क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ०१/०७/२०१९ अन्वये सदर जागा क्रीडा संकुल उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत म्हाडाकडे मागणी केली आहे. क्रीडा विभागास जागा हस्तांतरीत झाल्यानंतर क्रीडा संकुल उभारण्याबाबत निर्णय घेता येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणतेही नियम लागू नसल्याबाबत

**(१९) १८५१६ (०५-०४-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणतेही नियम लागू नसल्याची तक्रार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निवेदनातून प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणतेही नियम लागू न करणाऱ्या संबंधित शाळांवर कोणती कारवाई केली तसेच सदर कर्मचाऱ्यांना शासनाचे नियम लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०९-२०२५) :** (१) याबाबतची कोणतीही तक्रार क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तापी पाटबंधारे महामंडळाकडून उपसा सिंचन योजनेच्या धरण साठ्यावरील तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाबाबत

**(२०) १९२८५ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तापी पाटबंधारे महामंडळाकडून उपसा सिंचन योजनेच्या वीज पुरवठ्यासाठी धरण साठ्यावर ५०० मेगावेट तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केलेला असून सदर प्रकल्पातून महामंडळास कोटयवधीचे उत्पन्न मिळणार आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पास मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) :** (१) होय.

(२) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने धरणातील जलाशय पृष्ठभागावर तरंगता सौरऊर्जा प्रकल्प उभारणीसंदर्भात माहिती संकलित करणे व अनुषंगीक अभ्यास करणे या करीता समितीचे गठण प्रस्तावित असून याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.